लोकमत पृ. पान क्र. १

# बोगस ग्राहक पाठवून सेक्स रॅकेटची पोलखोल

## वेश्याव्यवसाय प्रकरणी महिला अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अल्पवयीन मुली व तरुणींना वेश्या व्यवसायास लावणाऱ्या एका महिलेस मीरा-भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने अटक केली आहे.

नगमा ऊर्फ जसप्रीत ऊर्फ नीलम अजितकुमार सांशी (वय २६) ही महिला वेश्या व्यवसायासाठी ग्राहक पुरुषांना व्हॉट्सॲपद्वारे फोटो पाठवून अल्पवयीन मुली व तरुणी पुरवत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली. पोलिसांनी बोगस ग्राहकामार्फत नगमा हिच्याशी संपर्क साधून वेश्या व्यवसायासाठी सौदा नक्की करत गोल्डन नेस्ट येथील नीरा कॉम्प्लेक्स जवळील एका हॉटेलमध्ये भेट ठरली.

■ नगमा ही एका १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीसह २१ व २९ वर्षांच्या आणखी दोन तरुणी अशा तिघींना घेऊन आली.

### पैशांचा व्यवहार होताच घेतले ताब्यात

पैशांचा व्यवहार होताच सापळा रचून असलेले समीर अहिररावसह उमेश पाटील, रामचंद्र पाटील, राजू भोईर, किशोर पाटील, केशव शिंदे, चेतनसिंग राजपूत, सम्राट गावडे, अश्विनी भिलारे, आफ्रिन जुनेदी यांच्या पथकाने नगमा हिला ताब्यात घेत तिन्ही पीडित मुलींची सुटका केली. नगमाविरुद्ध नवघर पोलिस ठाण्यात पॉक्सोसह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रखवालदाराचे २५ हजार चोरले


**मीरा रोड :** मीरा रोडच्या विनयनगर, पूजा पार्क भागातील विनय हेरिटेज इमारतीत कामदेव झा (वय ५०) हे रखवालदार म्हणून काम करतात. पहाटेच्या सुमारास शटर उघडून अनोळखी चोरट्याने झा यांच्या उशाखाली ठेवलेली २४ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. २९ मार्च रोजी काशिगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. काशिगाव पोलिस ठाण्याचे सहायक फौजदार ओमप्रकाश पाटील तपास करत आहेत.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण



**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका १२ वर्षीय ८ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून तिचे अपहरण केल्याप्रकरणी जिशान ऊर्फ असादूल प्रकाश दास याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक संजय लोखंडे-माळी हे अपहरण झालेल्या मुलीसह आरोपीचा शोध घेत आहेत.

# ड्रग्ज तस्कराला ठोकल्या बेड्या



**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नर्मदा पॅराडाईज इमारतीसमोरच्या रेल्वे लाइन भिंतीजवळ अमली पदार्थ विकणाऱ्या चंद्रकांत रामअवतार कलावटिया (वय ३४, रा. सायलेंट पार्क, गोल्डन वेस्ट भाईंदर पूर्व) याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून एक लाख रुपये किमतीचा हेरॉइन हा अमली पदार्थ जप्त केला आहे. हा अमली पदार्थ विकण्यासाठी तो येथे आला होता. पोलिस कर्मचारी नीलेश शिंदे यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून उपनिरीक्षक संजय लोखंडे माळी तपास करत आहेत.

# वृद्धाची गळफास घेत आत्महत्या



**मीरा रोड :** मीरा रोडच्या अपना घर फेज-२ मध्ये राहणारे राजन पाणीकत (वय ६५) यांनी २९ मार्च रोजी राहत्या घरातील हॉलमधील पंख्याला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी क्रतिका सिंग यांच्या माहितीवरून काशिगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आत्महत्येचे कारण अजून स्पष्ट झालेले नाही. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# कामगारास मारहाण

**मीरा रोड :** काशिगावच्या डाचकूलपाडा भागात राहणार गणेश नाना पाटील (वय २५) हे डाचकूलपाडा भागात कंपाउंडला पत्रे मारण्याचे काम करत असताना दिलीप व राजेंद्र या दोघांनी पाटील याला मागच्या बाजूला ओढून लाथाबुक्क्यांनी, तसेच कोणत्या तरी वस्तूने छातीत व अन्य ठिकाणी मारहाण करून जखमी केले. पाटील यांच्या फिर्यादीवरून काशिगाव पोलिसांनी दिलीप आणि त्याचा मुलगा राजेंद्र या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. काशिगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

लोकमत पू. पान क्र. १

# वसई किल्ला परिसरात बिबट्याच्या वावराने भीती

## वन विभागाने लावलेल्या कॅमेऱ्यात कैद

लोकमत न्यूज नेटवर्क

**विरार :** वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यामध्ये बिबट्याचा वावर असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. त्याचा शोध घेण्यासाठी वन विभागाने लावलेल्या कॅमेऱ्यामध्ये बिबट्या असल्याचे दिसून आले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बिबट्याला लवकरात लवकर पकडून सुरक्षित स्थळी सोडण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

वसई पश्चिमेच्या भागात वसईचा ऐतिहासिक किल्ला आहे. हा किल्ला पाहण्यासाठी हजारो पर्यटक येत असतात. त्यातच किल्ल्याच्या बाजूला मिरा-भाईंदरला जाण्यासाठी रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. किल्ल्याच्या परिसरात शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास बिबट्याचा वावर असल्याची माहिती कळताच आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच त्यांनी किल्ल्याच्या परिसरात खात्री करण्यासाठी ट्रॅप कॅमेरे लावले.



### वनविभागाकडून शोध मोहीम सुरू

- या ट्रॅप कॅमेऱ्यांमध्ये बिबट्याची दृश्ये दिसून आल्याने बिबट्याची वनविभागाकडून युद्धपातळीवर शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे.
- किल्ल्याच्या भागाला लागून मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती व कोळीवाडा आहे. रात्रीच्या वेळी व सकाळी या भागातील रस्त्यावर नागरिक चालण्यासाठी जातात.
- आजूबाजूला घनदाट झाडे-झुडपे असल्याने झुडपांमध्ये लपून बसलेला बिबट्या दिसून येणार नाही. त्यामुळे नागरिकांवर हल्ला होण्याची शक्यता आहे.
- या परिसरातून ये-जा करताना, रात्रीच्या सुमारास बाहेर पडताना सावधानता बाळगावी, असे आवाहन वनविभागाकडून नागरिकांना करण्यात आले आहे.




# एकाला रॉडने मारले; पोटात चावीने खुपसले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा खाडी, ब्राह्मणदेव नगर येथे राहणारे बशिष्ठ जैसवाल (३३) हे साईमंदिर, आदर्श डेकोरेटर येथून जात असताना विजय यादव याने त्यांना पोटात जोराने लाथ मारून खाली पाडले व स्कूटीच्या चावीने ठिकठिकाणी खुपसले.

सचिन यादव याने लोखंडी रॉडने मारले तर भंडारी याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यात जैसवाल हे गंभीर जखमी झाले असून भाईंदर पोलिसांनी विजय व सचिन यादवसह भंडारी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक अनिल करे हे तपास करत आहेत. पोलिसांनी विजय व सचिन यादव या दोघांना अटक केली आहे.

लोकमत पू. पान क्र. ४

# पोलिसांचे अध्यात्माद्वारे ताण व्यवस्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाला ताणतणाव वाटणे स्वाभाविक आहे. आपण तणावाचा सामना कसा करतो, हे आपल्या मनावर अवलंबून आहे. आपले मन इंद्रियांच्या प्रभावाखाली असेल तर ते इंद्रियांसाठी कामे करेल आणि जर मन प्रापंचिक गोष्टी आणि इंद्रियांपासून वळवून श्वासावर लक्ष केंद्रित केले तर व्यक्ती तणावमुक्त होईल, असे मत हंस विजयनगर आश्रम, वसईचे प्रभारी महात्मा मुसाफिरनंद यांनी व्यक्त केले.

मानव उत्थान सेवा समितीचे संस्थापक सद्गुरुदेव श्री सत्पालजी महाराज यांनी तुळींज पोलिस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना तणाव व्यवस्थापनावर कशी मात करावी, हे समजावून सांगितले. संस्थेचे युवा प्रतिनिधी प्रितेश यांनी संस्थेचा आणि श्रीगुरू महाराजांचा परिचय करून दिला. त्यानंतर मुंबईहून आलेल्या उर्मिलाबाई यांनी उपस्थित पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांसमोर मनोगत व्यक्त केले.

लोकमत पान क्र. 5

# मीरा रोडमध्ये आचारसंहितेचा भंग

## शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशिगाव येथील जरीमरी तलावाजवळ लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असतानाही एका संस्थेच्या नावाने शिवजयंतीचा कार्यक्रम करत, त्या सार्वजनिक ठिकाणी नेत्यांचा उल्लेख असलेले बेकायदा बॅनर लावत आचारसंहिता भंग केल्याबद्दल शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर काशिगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर त्याचा भंग केल्याबद्दलचा हा शहरातील पहिला गुन्हा आहे.

धर्मवीर आनंद दिघे चौकात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या नावाने शिंदेसेनेचे पदाधिकारी असलेले बाबासाहेब बंडे, रामभवन शर्मा आदींनी पालिकेची परवानगी घेऊन शिवजयंतीचा कार्यक्रम केला.

**१** मात्र, आचारसंहिता भंग करण्यासह शिवजयंती कार्यक्रमात भोजपुरी अश्लील गाणी व नाचही ठेवल्याने भाजपसह मनसे, मराठी एकीकरण समिती, उद्धवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी टीका करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचबरोबर मनसेच्या पदाधिकारी कविता वायंगणकर यांनीही पोलिस ठाण्यात जाऊन कारवाईची मागणी केली होती.

**२** शनिवारी रात्री महापालिकेचे कर्मचारी शशिकांत पवार यांच्या वतीने काशिगाव पोलिस ठाण्यात शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर आचारसंहिता भंग केल्याबद्दल गुन्हा नोंदविण्यात आला असून यांप्रकरणी काशिगाव पोलिस अधिक तपास करत आहेत.

लोकमत पान क्र. 7

# व्यावसायिक स्पर्धेतून फास्ट फूडमध्ये ठेवले पिस्तूल

## मीरा-भाईंदर गुन्हे शाखेने दोघांना ठोकल्या बेड्या; आरोपींकडून २ पिस्तुले, जिवंत काडतुसांचे राउंड जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशिमीरामध्ये हॉटेल-फास्ट फूडसाठी लागणाऱ्या काउंटरपासून फर्निचर आदींच्या व्यवसायातील रोषातून तीन व्यावसायिकांकडे शस्त्रे ठेवण्याचे कारस्थान करणाऱ्या दोघांना मीरा-भाईंदर गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने बेड्या ठोकल्या. या कारवाईत दोन पिस्तुले, तर आरोपींकडून २ पिस्तुले व जिवंत राउंड पोलिसांनी जप्त केले. ही पिस्तुले प्रतिस्पर्धी व्यावसायिकांच्या सामानात ठेवून त्यांनासुद्धा खोट्या गुन्ह्यात



पोलिसांनी पिस्तूल, ८० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व ४३ जिवंत काडतुसांचे राउंड असा अडीच लाखांचा शस्त्रसाठा जप्त केला.

अडकवण्याच्या प्रयत्नात होते, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.

काशिमीरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मीरा गावठाण महाविष्णू मंदिरशेजारी बिंदा फास्ट फूड आहे. या फास्टफूड चालकांनी भाईंदर पूर्व उड्डाणपुलाजवळ मुन्ना ऊर्फ अनिस खान या व्यावसायिकाकडून फूड काउंटर शुक्रवारी रात्री खरेदी केले होते. त्यातील कप्प्यात शस्त्रे सापडल्याने त्यांनी तत्काळ पोलिसांना कळवले. काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळेंसह उपनिरीक्षक शिवाजी खाडे व अन्य अधिकारी-कर्मचारी यांनी घटनास्थळी पोहोचून दीड लाख रुपये किमतीची मेड इन यूएसए लिहिलेली पिस्तुले, ८० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व ४३ जिवंत काडतुसांचे राउंड असा २ लाख ४५ हजार रुपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त केला. शनिवारी पोलिसांनी अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल केला.

### पोलिसांच्या रेकॉर्डवरचा गुन्हेगार

शस्त्र सापडल्याने गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मीरा-भाईंदर गुन्हे शाखा-१ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला. पोलिसांनी मुन्ना यांच्याकडे चौकशी केली. पोलिसांनी तपास चालवला असता मुन्नासह अन्य दोघा व्यावसायिकांना शस्त्रांच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी व्यावसायिक प्रतिस्पर्धी फिरोज याने हा कट रचला होता, असे समोर आले. पोलिसांनी फिरोज व शाकीर या दोघांना अटक केली असून त्यांच्याकडून २ पिस्तुले पोलिसांनी जप्त केली आहेत. शाकीर हा पोलिसांच्या रेकॉर्डवरचा गुन्हेगार आहे.

लोकमत पृ. पान क्र. ३

# सरकारी स्टॉलसाठी ५० हजार रुपये घेऊन गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या रिशिता अपार्टमेंटमध्ये राहणारे ब्रिजेश उपाध्याय हे टॅक्सीचालक असून त्यांची मुलगी भावना (वय २१) ही दिव्यांग आहे. त्यामुळे सरकारतर्फे मिळणारा स्टॉल बनवण्याकरिता त्यांनी सेंदीलकुमार पालनाथ नाडर याला ५० हजार रुपये दिले होते. परंतु पैसे घेतल्यानंतरदेखील नाडर याने काम केले नाहीच, शिवाय घेतलेले ५० हजार रुपयेसुद्धा परत केले नाहीत. उपाध्याय यांनी पैसे मागितले असता त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. उपाध्याय यांच्या फिर्यादीवरून नाडर विरुद्ध नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हवालदार दुधाळ हे तपास करत आहेत.

# घरात घुसून चोराने ७३ हजार लांबवले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या प्रकाश मार्केटजवळील अरिहंत अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या वृद्धाच्या घरात घुसून चोराने ७३ हजार रुपये लांबवले आहेत.

८९ वर्षीय वृद्ध मफतलाल गांधी हे घरी एकटेच होते. त्यांची दोन मुले संजय व नीलेश कामावर गेले होते. त्यावेळी भरदिवसा अनोळखी चोरट्याने घरात घुसून बेडरूममधील मंदिराजवळच्या गल्ल्यातून ७३ हजार ५०० रुपयांची रोकड चोरून नेली. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# बालकांचे अश्लील व्हिडीओ टाकणाऱ्यावर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : बालकांचे लैंगिक शोषणाबाबतचे तसेच अश्लील आणि लैंगिक भावना चाळवणारे व्हिडीओ फेसबुक या समाजमाध्यमावर इंटरनेटचा गैरवापर करून प्रसारित केल्याबद्दल माधवराव पटेल नावाच्या व्यक्तीविरुद्ध नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस कर्मचारी ओमकार यादव यांनी पटेलविरुद्ध फिर्याद दिली होती. पोलिस गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# फ्लॅट विक्रीत ४९ लाखांना गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या डी-मार्टजवळ राहणारे पंकज प्रल्हाद जोशी यांना फ्लॅटची विक्री करतो, असे सांगून त्यांच्याकडून ४९ लाख ३९ हजार रुपये चंद्रकांत म्हात्रे व विशाल म्हात्रे यांनी घेतले होते. ऑक्टोबर २०१३ पासून सप्टेंबर २०२३ पर्यंत पैसे घेऊनसुद्धा फ्लॅट मात्र दिला नाही. त्यामुळे जोशी यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी चंद्रकांत व विशाल म्हात्रे या दोघांवर २९ मार्च रोजी गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलिस गुन्ह्याचा तपास करत आहेत.

पुढारी पान क्र. ३

# इमारतीवरून पडून कामगाराच्या मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल

मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा

काशीगाव येथील निलकमल नाका येथे एका वादग्रस्त एनिमी जमिनीवर इमारत बांधण्याचे काम सुरू असताना दोन दिवसांपूर्वी त्याठिकाणी एक कामगार पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्यावरून काशीगाव पोलीस ठाण्यात बिल्डर आणि ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ह्यात कामगार आयुक्त आणि पालिका अधिकाऱ्यांवरही त्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी बांधकाम कामगार युनियनने केली आहे.

काशीगाव येथे नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असताना त्यावरून पाणी मारताना त्याठिकाणी कुठलीच सुरक्षा व्यवस्था ठेवलेली नाही. त्यामुळे दुसऱ्या मजल्यावरून पडून कामगार मोहम्मद सलीम याचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी मालक व बिल्डर आनंद अग्रवाल व इतर भागीदार आणि ठेकेदार के.पी. बिल्डकॉन वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर शहरात मोठं मोठ्या नवीन टोलेजंग इमारतीचे बांधकाम सुरू आहे. त्याठिकाणी सुरक्षा व्यवस्थेची कुठलीच खबरदारी घेतली जात नाही तसेच कामगार आयुक्त ठाणे यांच्याकडील अधिकारी यांच्यासोबत आर्थिक हितसंबंध असल्याने कुठलाच अधिकारी कोणत्याही नवनिर्माणाधीन कामावर जाऊन पाहणी करत नाही यामुळे कामगार वाऱ्यावर सुटले आहेत. यामुळे महापालिका, कामगार आयुक्त यांच्यावरही सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा आणि त्यांनाही ह्या गुन्ह्यात आरोपी बनवावे अशी मागणी नाका कामगार युनियनचे सादिक बाशा व के. नारायण बांधकाम कामगार युनियन अध्यक्ष यांनी केली आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. ४

# फरार असलेल्या मुख्य आरोपीला पोलिसांनी केली यूपीतून अटक

## पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

**। नालासोपारा :** खुनाच्या गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी यूपीतून अटक केली आहे. मुंबईतील कांदिवलीच्या मारुती चाळीत राहणारा सुधीर सिंग (२७) आणि वालईपाडा रोडवरील उपाध्याय चाळीत राहणारा वैभव मिश्रा (२८) हे दोघे १२ जानेवारीला गौराईपाडा परिसरात रूम बघण्यासाठी गेले होते. यावेळी आरोपींनी त्याचे अपहरण करून गौराईपाडा परिसरातील यादवेश विद्यालयाच्या बाजूला असलेल्या पार्किंगच्या मोकळ्या जागेत आरोपींनी कोयता, धारदार हत्याराने वार करून लाकडी बांबू व लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे ठार मारले होते.

याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात केली होती. पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी आरोपी सूरज चव्हाण (२५), साहिल विश्वकर्मा (२१) आणि अखिलेश सिंग (२७) या तिन्ही आरोपींना १२ जानेवारीला पुण्याच्या सिंहगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आनंद नगर परिसरातून पळून जात असताना पाठलाग करून शिताफीने पकडले होते. पण गुन्हा घडल्यापासुन या गुन्हयातील मुख्य आरोपी राहुल पाल ऊर्फ मर्दा हा परागंदा झाला



होता. याची दखल घेऊन पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी तुकाराम भोपळे, पोहवा योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अविनाश देसाई, फिरोज तडवी, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नामदेव ढोणे, सोहेल शेख यांनी पार पाडली आहे.

गुन्ह्यातील मुख्य आरोपी राहुलचा शोध घेण्यासाठी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी आदेश दिले होते. त्यानुसार पेल्हारचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी, अंमलदार यांनी फरार आरोपीबाबत तांत्रिक माहिती प्राप्त केली. आरोपी हा राज्य उत्तर प्रदेश येथे असण्याची शक्यता असल्याने पेल्हार पोलीस त्याचा शोध घेण्यासाठी भदोई येथे गेले. भदोई जिल्ह्यातील चौरीबाजार याठिकाणी आरोपीची माहिती प्राप्त करून तो रामपूर येथे असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने तात्काळ रामपूर येथील पोलिसांच्या मदतीने आरोपीचा साकरी या गावात शोध घेत असता, त्याला पोलिसांची चाहूल लागल्याने तो जंगलात पळून जात असताना त्याचा पाठलाग करून अटक केली.

# मीरा–भाईंदरमध्ये रस्ते खोदल्यामुळे वाहतूक कोंडी

## नागरिक त्रस्त, प्रशासन सुस्त, नियोजनाचा वाजला बोऱ्या

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या कामासाठी राज्य शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. शहरात सगळीकडे सिमेंट काँक्रीट रस्त्याची कामे सुरू आहेत. मात्र रस्ते खोदल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. विकासकामे करत असताना महापालिका प्रशासनाने योग्य नियोजन न करता त्याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.



मीरा-भाईंदर शहरात पावसाळ्यानंतर रस्त्यावर खड्डे पडतात. त्यावर महापालिकेकडून दरवर्षी करोडो रुपये खर्च केले जातात. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांना खड्ड्यांचा सामना करावा लागतो. यातून नागरिकांची सुटका व्हावी, यासाठी महापालिकेने सिमेंट काँक्रीट रस्ते बनवण्याचा निर्णय घेतला. यासाठी काही निधी राज्य शासनाने दिला. तर महापालिका आर्थिक संकटात असताना काही रस्त्याच्या कामासाठी महापालिकेने ५०० कोटीचे कर्ज काढले आहे.

सिमेंट रस्त्याची कामे करायची आहेत. त्यामुळे ठिकठिकाणी चांगले रस्तेदेखील महापालिका खोदत आहे. तर काही ठिकाणी वर्ष-सहा महिन्यांपूर्वी बनवले रस्ते खोदले जात आहेत. जे रस्ते बनवणे आवश्यक होते, तेच रस्ते अगोदर बनवायला पाहिजे होते. परंतु सगळीकडे रस्त्याचे काम सुरू केले आहे. अनेक ठिकाणी बनवण्यात येत असलेली सिमेंट रस्ते देखील निकृष्ट दर्जाचे बनवले जात आहेत. यावर महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. ठेकेदार व अधिकाऱ्यांचे हितसंबंध असल्याने त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. सिमेंट रस्त्याच्या कामासाठी एकाच वेळी शहरातले अनेक अंतर्गत रस्त्यांची एक बाजू खोदण्यात आली आहे. दुसऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत. काम सुरू असलेली रस्ते अर्धवट बनवली आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडली आहे. जवळ जाण्यासाठी बराच वेळ कोंडीत अडकून पडावे लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

पूर्वी खोदण्यात आलेले रस्ते वाहतुकीसाठी अद्याप खुले करण्यात आलेले नाहीत. असे असताना आता नव्या रस्त्यांचे खोदकाम कंत्राटदराकडून सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे शहरात सगळीकडे रस्ते खोदल्याचे चित्र दिसून येत आहे. पालिका प्रशासनाने नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना करणे अपेक्षित आहे. परंतु याकडे महापालिका अधिकारी दुर्लक्ष करत आहे. येत्या काळात विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यासाठी सर्वत्र काँक्रीट रस्ते बनवण्याचे काम सुरू असल्याचे बोलले जात आहे. विकासकामांना विरोध नाही, परंतु त्याचे योग्य नियोजन केलेले नाही.

सकाळ पू पान क्र. १

# उत्तन कचरा समस्या पेटणार!

## महापालिकेच्या गाड्या अडवण्याचा नागरिकांकडून इशारा

भाईंदर, ता. ३१ (बातमीदार) : उत्तन येथील डम्पिंग ग्राऊंडचा मुद्दा आता चांगलाच तापण्याची लक्षणे आहेत. येथील कचऱ्याला वारंवार आग लागून निर्माण होणाऱ्या धुराने स्थानिक हैराण झाले आहेत. यावर तोडगा काढण्याचे आश्वासन महापालिकेकडून वारंवार दिले जात असतानाही त्यात कोणतीही प्रगती होत नसल्याने नागरिक आक्रमक झाले आहेत. डम्पिंग ग्राऊंडविरोधात तीव्र आंदोलन सुरू करण्याच्या मानसिकतेत रहिवासी आहेत व वेळ पडल्यास कचऱ्याच्या गाड्याही अडवण्याची आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आहे.

उत्तन येथील धावगीच्या डोंगरावर असलेल्या डम्पिंग ग्राऊंडविरोधात स्थानिक १५ वर्षे संघर्ष करत आहेत. कचऱ्याची दुर्गंधी आणि धुराने अनेकांना विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते, तर काही भागातील रहिवाशांना घराचे दरवाजे बंद करून बसण्याची वेळ येते. चार वर्षांपूर्वी स्थानिकांनी डम्पिंगविरोधात आक्रमक भूमिका घेऊन कचऱ्याच्या गाड्या अडविण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी ग्रामस्थांसोबत बैठक घेत त्यांची समजूत काढली होती.

मिरा-भाईंदर शहरात दहा ठिकाणी बायोगॅस तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्याचे आश्वासन त्या वेळी देण्यात आले. दहा प्रकल्पांमुळे उत्तनमध्ये जाणारा कचरा निम्म्याहून कमी होईल, असे सांगण्यात आले होते. दुसरीकडे डम्पिंग ग्राऊंडवर असलेल्या दहा मेट्रिक टन कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करून तो नष्ट केला जाईल आणि २०२३ च्या पावसाळ्याआधी हे काम पूर्ण केले जाईल, असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांनी संयमाची भूमिका घेत आंदोलन पुढे ढकलले होते.

चार वर्षांत एकाही आश्वासनाची पूर्तता प्रशासनाकडून झाली नाही. दहापैकी दोन बायोगॅस प्रकल्प सुरू झाले असून तेदेखील पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नाहीत. दुसरीकडे बायोमायनिंगचे काम धीम्या गतीने सुरू असून ते पावसाळ्याआधी संपण्याची सूतराम शक्यता नाही. त्यामुळे फसवणूक केली जात असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे.

> डम्पिंग ग्राऊंडवर साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया वेगाने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांसोबत पुन्हा एकदा यासंदर्भात बैठक आयोजित केली जाणार आहे.
>
> **- अनिकेत मानोरकर**, अतिरिक्त आयुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

### आगप्रकरणी गुन्हा दाखल

डम्पिंग ग्राऊंडला शनिवारी (ता. ३०) लागलेल्या आगीमुळे नागरिकांच्या जिवाला व आरोग्याला धोका निर्माण झाल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात महापालिकेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती उत्तन सागरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दादाराम करांडे यांनी दिली.

### आश्वासन कागदावरच

याआधीही २००९ मध्ये डम्पिंगविरोधात ग्रामस्थ रस्त्यावर उतरले होते व त्यांनी कचऱ्याच्या गाड्या अडवून धरल्या होत्या. त्यावेळी दगडफेक होऊन पोलिसांकडून लाठीमारही करण्यात आला होता. त्यावेळी डम्पिंग ग्राऊंड अन्य ठिकाणी स्थलांतर करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र हे आश्वासनही कागदावरच राहिले.

> धावगीच्या डोंगरावर असलेले डम्पिंग ग्राऊंड पूर्णपणे बेकायदा आहे. या ठिकाणाहून त्याचे स्थलांतर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत; मात्र प्रशासनाकडून आश्वासनांव्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही होत नाही. डम्पिंग ग्राऊंडद्वारे स्थानिकांना स्लो पॉयजनिंग केले जात आहे. ते तातडीने स्थलांतर केले नाही, तर उपोषण सुरू केले जाईल. त्याचप्रमाणे कचऱ्याच्या गाड्याही अडवल्या जातील. **- ऑस्कर मेन्डोन्सा**, धर्मगुरू, डोंगरी चर्च



**भाईंदर :** उत्तन येथील धावगीच्या डोंगरावरील कचरा बायोमायनिंग प्रक्रिया करून नष्ट केला जाईल, असे पालिका प्रशासनाने आश्वासन दिले होते. मात्र अद्याप या ठिकाणी कचऱ्याचा डोंगर वाढत आहे.

CamScanner

सकाळ पू. पान क्र. १

# वसईत आज काँग्रेसचे आंदोलन

विरार, ता. ३१ (बातमीदार) : भाजपने प्राप्तिकराच्या नावाखाली काँग्रेसची आर्थिक कोंडी केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या ऐनवेळी काँग्रेसची बँक खाती गोठवली आहेत. आता एक हजार ८०० कोटींचा दंड भरण्याची नोटीस पाठवली आहे. केंद्रातील भाजपप्रणित मोदी सरकारचा कर दहशतवाद आणि हुकूमशाही सुरू असल्याचे म्हणत आणि त्यांचा मनमानी, संविधानविरोधी, लोकशाहीविरोधी कारभाराचा जाहीर निषेध करण्यासाठी काँग्रेसतर्फे उद्या (ता. १) सकाळी वसई तहसीलदार कार्यालयाजवळ निदर्शने करण्यात येणार आहेत. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे काँग्रेसचे वसई-विरार शहर जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांनी सांगितले.

केंद्रातील भाजपप्रणित मोदी सरकार हे संपूर्ण देशात लोकसभेची आचारसंहिता लागू असताना विरोधी पक्षाचा, विरोधी पक्ष नेत्यांचा आवाज दाबण्यासाठी हुकूमशाहीप्रमाणे वागत आहे. मोदी सरकारची ही कारवाई लोकसभा निवडणुकीत आर्थिक संकटात टाकणारी निष्पक्ष व मोकळ्या वातावरणात निवडणूक लढवण्याच्या तत्त्वाला बाधा पोहोचवणारी आहे. हा लोकशाहीवरील मोठा हल्ला असून हा मोदी सरकारचा कर दहशतवादच आहे. एवढेच नव्हे तर विरोधी पक्षाचे नेते व मुख्यमंत्री यांना खोटे आरोप करून तुरुंगामध्ये बंद केले जात आहे, असेही आल्मेडा यांनी सांगितले.

म. टा. पू. पान क्र. १

# 'शिवजयंती'ला अश्लील नृत्य

मिरा-भाईंदर : शिवजयंतीनिमित्त काशिमिरा येथे शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात अश्लील गाण्यावर नृत्य करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यावर शिवप्रेमींसह सामाजिक संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आयोजक शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

काशिमिरा येथील आनंद दिघे चौकात शिवसेना शिंदे गटाचे स्थानिक पदाधिकारी असणाऱ्या रामभवन शर्मा व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी एका प्रतिष्ठानच्या नावाखाली शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी भोजपुरी गाणे वाजवून त्यावर तरुणीने अश्लील नृत्य केले. ही बाब समाज माध्यमांवर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर समोर आली. यावर सर्वच स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे. मराठी एकीकरण समिती व मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिसांची भेट घेऊन आयोजकांवर कारवाई करण्याची मागणी लेखी पत्राद्वारे केली आहे.

CamScanner